नि.फौ.ख.क्र. १००/२०२१
सरकार वि. मुकेश
नि.क्र.१७

साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–नंदकिशोर विठोबाजी पडोळे
वय ४२ वर्ष, व्यवसाय–शेती.
राह.सिसी, तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी समन्स पत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीला **निशानी क्र. १८** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.१९** देण्यात आला. पोलिसांनी माझे बयाण नोंदविले होते किंवा कसे माहित नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०५/२०२१ रोजी पंचनामा करणेकामी हजर राहण्यासाठी समन्स पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला सिर्सी येथे बोलावुन माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा वाचुन दाखविला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष रेती आणि ट्रक्टर जप्त केले होते. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी बरोबर लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.एम.आर.धांडे यांनी उलटतपास नाकारला.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०६.०६.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड